# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### उदगीर (जि.लातूर) येथील उपजिल्हा रुग्णालयात औषधे व सोयीसुविधे अभावी रुग्णांची होणारी गैरसोय

**(१) ३१४५७ (२३-०१-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि.लातूर) येथे उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांवर तपासणी व उपचार योग्य पध्दतीने होत नसून याठिकाणी औषधाचा कृत्रिम तुटवडा निर्माण केला जात असल्याबाबतच्या अनेक तक्रारी रुग्णालय प्रशासनास अनेक सामाजिक संघटना व नागरिकांनी वेळोवेळी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच रुग्णालयात एक्सरे मशीन असूनही त्याठिकाणी लागणारे तज्ञ नसल्यामुळे तपासणी करण्यासाठी रुग्णांना खाजगी रुग्णालयात जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपजिल्हा रुग्णालयात असलेला वैद्यकिय कर्मचारी क्षमतेपेक्षा कमी असल्याचे लोकप्रतिनिधींनी शासनाकडे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपजिल्हा रुग्णालयातील औषधे व सोयीसुविधा पुरविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२३-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.

तथापि, अशा आशयाची बातमी दैनिक सकाळ या वृत्तपत्रामध्ये दिनांक ११.०७.२०१५ रोजी प्रसिध्द झाली होती.

(२) हे खरे नाही.

उपजिल्हा रुग्णालय, उदगीर (जि.लातूर) येथे एक्स-रे मशीन उपलब्ध असून दोन तंत्रज्ञ कार्यरत आहेत. एक्स-रे तपासणीसाठी आलेल्या रुग्णांची तपासणी रुग्णालयातच करण्यात येत आहे.

(३) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

उपजिल्हा रुग्णालय, उदगीर येथे एकूण ९४ पदे मंजूर असून त्यापैकी ८५ पदे भरलेली आहेत व ९ पदे रिक्त आहेत.

(४) राज्यातील आरोग्य संस्थांसाठी आवश्यक असलेली औषधे व साहित्यसामग्री पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत. औषधी भांडारात उपलब्ध नसलेली औषधे स्थानिक स्तरावर खरेदी करुन रुग्णांना उपलब्ध करुन दिली जातात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड येथील शासकीय रुग्णालयात प्रसुतीसाठी दाखल करण्यात आलेल्या महिलेला डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे झालेला मृत्यू**

**(२) ४२९५६ (१०-०५-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील शासकीय रुग्णालयात प्रसुतिसाठी दाखल करण्यात आलेल्या महिलेला डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे व उपचार वेळेवर मिळाले नसल्यामुळे सदर महिलेचा दिनांक ८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषी डॉक्टरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१७-०६-२०१७) :** (१) नाही,

तथापि, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड येथे श्रीमती सविता संजय सरपाते नामक गर्भवती महिला आंतररुग्णाचा दिनांक ११.०१.२०१६ रोजी सकाळी ३.०० वाजता अतिउच्च रक्तदाबामुळे झालेल्या “डी.आय.सी.” या विकारामुळे व मेंदूतील रक्तस्त्रावामुळे मृत्यू झाला.

उक्त रुग्णालय कर्तव्यावरील डॉक्टरांनी योग्य ते उपचार केले होते व त्यांनी कोणत्याही प्रकारे निष्काळजीपणा केला नाही.

शिवाय, उक्त रुग्णाच्या मृत्यूचे कारण तिच्या नातेवाईकांना कळविण्यात आले व त्यांनी कोणत्याही डॉक्टरविषयी तक्रार नसल्याचे लेखी स्वरुपात कळविले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडहिंग्लज, आजरा, चंदगड (जि.कोल्हापूर) तालूक्यातील नागरीकांना कर्नाटक राज्यातील बेळगाव येथे असलेल्या केएलई रुग्णालयातून राजीव गांधी जीवनदायी योजनेमार्फत उपचार मिळणेबाबतची मागणी**

**(३) ४५३७५ (११-०५-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज, आजरा, चंदगड तालुक्यातील नागरीकांना कर्नाटक राज्यातील बेळगाव येथील केएलई रुग्णालयामध्ये राजीव गांधी जीवनदायी योजनेतून उपचार मिळणेबाबतची मागणी मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचेकडे चंदगडचे लोकप्रतिनिधी यांनी माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्य अनुषंगाने शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०४-०७-२०१७) :** (१) हे खरे आहे.

चंदगडच्या लोकप्रतिनिधींनी दि.१५.०६.२०१६ रोजीच्या पत्रान्वये मा. मुख्यमंत्री महोदयांना निवेदन दिलेले आहे.

(२) शासन निर्णय दि. ४ ऑगस्ट, २०१६ अन्वये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना संपुर्ण राज्यात राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर योजनेमध्ये अपवादात्मक परिस्थितीत आवश्यकतेनुसार, सीमावर्ती राज्यातील शासकीय रुग्णालयांना एका वर्षासाठी योजनेंतर्गत अंगीकृत करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर योजना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात अंमलात आणण्याचे प्रस्तावित असून विमा कंपनीची निवड झाल्यानंतर राज्य आरोग्य हमी सोसायटीमार्फत सदर रुग्णालये अंगीकृत करण्याबाबतची आवश्यक कार्यवाही सोसायटीमार्फत करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महामार्ग तसेच विविध रस्त्यांवर जखमी रुग्णांना ३० हजार रुपयांचे विमा कवच मिळण्याबाबतची योजना**

**(४) ५०३९५ (११-०५-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महामार्ग तसेच विविध रस्त्यांवर रोज घडणाऱ्या अपघातानंतर उपचार न मिळाल्याने शेकडो जण मृत्यूमुखी पडत असुन काही जणांना कायमचे अपंगत्व येत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त कारणास्तव जखमी रुग्णांवरील तातडीच्या उपचारांसाठी आरोग्य विभागाने (रस्ते अपघात विमा योजना) तयार केली असून अपघातातील जखमीला ३० हजार रुपयांचे विमा कवच मिळण्याबाबतची योजना सुरु करण्याबाबत शासन आवश्यक कार्यवाही त्वरीत करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२०-०६-२०१७) :** (१) व (२) अपघातग्रस्त रुग्णांना वेळीच गोल्डन अवर मध्ये उपचार मिळाल्यास व रुग्णांना जवळच्या रुग्णालयात स्थलांतरीत केल्यास अशा रुग्णांच्या मृत्यूंचे व अपंगत्वाचे प्रमाण कमी होऊ शकेल. या उद्देशाने दि. ७ जून, २०१६ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत स्व. बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजनेस तत्वत: मान्यता दिली आहे.

सदर योजनेंतर्गत अपघातग्रस्त व्यक्तींना रु.३०,०००/- पर्यंत विमा कवच देण्याचे प्रस्तावित असून सदर योजनेचे स्वरुप, व्याप्ती, आर्थिक भार याकरिता नियोजन व वित्त विभागाचे अभिप्राय घेऊन मंत्रिमंडळाच्या मान्यतेने प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्याच्या पॅथॉलॉजी लॅब मधील टेक्निशियनना पॅथलॅब चालवण्यास बंदी घालणेबाबत

**(५) ५३९१४ (२२-०८-२०१६). अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अजय चौधरी (शिवडी), अॅड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सदा सरवणकर (माहिम), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पॅथॉलॉजी लॅब मधील टेक्निशियनना पॅथलॅब चालवण्यास बंदी घालणाऱ्या आदेशामध्ये शासनाने अचानक निर्णयात बदल केले असून, राज्याच्या ग्रामीण भागात टेक्निशियनना पॅथलॅब चालवण्याचे तसेच पॅथॉलॉजी चाचण्या करण्याचे अधिकार देण्याची योजना देखील तयार होत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबईसह राज्यात असलेल्या सुमारे ५००० बोगस पॅथॉलॉजी लॅबबाबतची तक्रार महाराष्ट्र असोसिएशन ऑफ प्रॅक्टिसिंग पॅथॉलॉजीस्ट अॅण्ड मायक्रोबायलोजीस्ट संघटनेने माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान महाराष्ट्र मेडीकल कॉन्सिलकडे केली असून, उक्त लॅब पैकी ७०० ते ८०० लॅब मुंबई, ठाणे, नवी मुंबई व कल्याण परिसरात असल्याचेही तक्रारीत नमुद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बोगस पॅथॉलॉजी लॅबवर कारवाई करावी अशी मागणी शिवसेना ग्राहक संरक्षण कक्षाचे सरचिटणीस यांनी अन्न व औषध प्रशासन सहआयुक्त यांजकडे माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान प्रत्यक्ष भेट घेऊन केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अश्याप्रकारे टेक्निशियनना पॅथॉलॉजी लॅब देणे म्हणजे जनतेच्या आरोग्याशी तडजोड असून रुग्णांची लूटमार होण्याचा मार्ग मोकळा होण्याची भीती असून या विषयाची गहनता लक्षात घेऊन शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१७-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र असोसिएशसन ऑफ प्रॅक्टिसिंग पॅथॉलॉजिस्ट ॲण्ड मायक्रोबायोलॉजिस्ट यांचेकडून काही पॅथॉलॉजिस्ट पॅथॉलॉजी लॅबमध्ये न जाता वैद्यकीय चाचण्या रिपोर्टवर स्वाक्षरी करत असल्याबाबत व एकच पॅथॉलॉजीस्ट एकाच दिवशी विविध पॅथॉलॉजी लॅबमध्ये जात असल्याबाबतच्या अशा आशयाच्या तक्रारी महाराष्ट्र वैद्यक परिषदेकडे प्राप्त झाल्या आहेत.
(३) शिवसेना ग्राहक संरक्षण कक्ष, मुंबई यांचे सरचिटणीस यांनी, सह आयुक्त (औषधे) अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य, बृहन्मुंबई यांची दिनांक ०५.०४.२०१६ रोजी प्रत्यक्ष भेट घेतली होती. भेटीच्या वेळी त्यांनी इतर मुद्यांसोबत बोगस पॅथालॉजी लॅबवर कारवाई करण्याची मौखिक मागणी केली होती. तथापि पॅथालॉजी लॅबवर कारवाई करणे ही बाब, अन्न व औषध प्रशासनाशी संबंधित नसून त्यांचे अधिकार क्षेत्रात येत नाही. असे त्यांना चर्चेच्या वेळी स्पष्ट करण्यात आले होते.
(४) सदर प्रकरणी महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा व विधान परिषद या दोन्ही सभागृहाने राज्यात परावैद्यक परिषदेच्या स्थापनेबाबतचे विधेयक मंजूर केलेले असून, सदरचा कायदा हा दिनांक ३० जानेवारी, २०१६ रोजी राज्याच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात आला आहे.

परंतु सदर कायदयातील भाग-५(१) (Section-५ (१)) मध्ये नमुद तरतुदीनुसार अंमलबजावणीची तारीख निश्चित होताच सदरचा कायदा राज्यात लागू करण्यात येईल. शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील तीव्र टंचाईग्रस्त जिल्ह्यातील जलयुक्त शिवार अभियानाची अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत

**(६) ५५७४० (२२-०२-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील तीव्र टंचाईग्रस्त जिल्ह्यातील जलयुक्त शिवार अभियानाची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून १६ जिल्ह्यांना प्रत्येकी २ कोटी रु. देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी तात्काळ देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप उपाययोजना केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२०-०६-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मराठवाडा व विदर्भातील भीषण पाणीटंचाई समस्या विचारात घेऊन मा.मुख्यमंत्री यांचे निदे्रशानुसार "मुख्यमंत्री सहायता निधी-जलयुक्त शिवार" अंतर्गत एकूण १६ जिल्ह्यांना प्रत्येकी रु.२.०० कोटी पैकी ५० टक्के निधी (रु.१.०० कोटी) शासनस्तरावरु दि.७ मे, २०१६ व १३ मे, २०१६ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

उर्वरित ५० टक्के निधी योजनेच्या कामाची प्रगती विचारात घेऊन उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय रुग्णालयांतील औषधांचा रुग्णांना गुण येत नसल्याने रुग्णालयातील औषधांच्या गुणवत्तेबाबत**

**(७) ५६३०९ (३०-०८-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय रुग्णालयांतील औषधांचा रुग्णांना गुण येत नसल्याने रुग्णालयातील औषधांच्या गुणवत्तेबाबत प्रश्न चिन्ह निर्माण झाल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, करार पध्दतीने सरकारी औषधांची मोठ्या प्रमाणात खरेदी केली असून पुरवठा करणाऱ्या कंपन्या खाजगी प्रयोगशाळातून ही औषधे तपासून घेत असल्याने औषधांच्या गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे औषध क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील प्रकरणी चौकशी करण्यात आली काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासकीय रुग्णांलयातील औषधांचा दर्जा सुधारणेबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२७-०६-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही.

आरोग्य सेवा संचालनालयाच्या अखत्यारितील आरोग्य संस्थांसाठी पुरवठा करण्यात येणा-या औषधांची गुणवत्ता तपासणी एनएबीएल (नॅशनल ॲक्रेडीशन बोर्ड फॉर टेस्टींग ॲण्ड कॅलिब्रेटींग लॅबरोटरीज) कडून मान्यता प्राप्त प्रयोगशाळा मार्फत करण्यात येते. सदरहू तपासणी अहवाल समाधानकारक आल्यानंतरच औषधांच्या वितरणास परवानगी देण्यात येते.

तसेच वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अखत्यारितील वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये यांना पुरवठा करण्यात येणाऱ्या औषधांची तपासणी अन्न व औषधी प्रशासनाकडून वेळोवेळी केली जाते.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील व दारिद्र्य रेषेवरील दीड लाख उत्पन्न असलेल्या रुग्णांना खाजगी रुग्णालयात उपचार देत नसल्याबाबत**

**(८) ५८८८० (३०-०८-२०१६). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०१२ पासून राज्यातील ग्रामीण भागातील दारिद्र रेषेखालील व दारिद्र रेषेवरील १ लाख ५० हजार उत्पन्न असल्यास रुग्णाना खाजगी रुग्णालयामध्ये २० टक्के जागा राखून ठेवलेल्या रुग्णाना उपचार देत नसल्याचे शासनाकडे मोठ्या प्रमाणात तक्रारी आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजने अंतर्गत ग्रामीण भागातील दारिद्र रेषेखालील रुग्णाना उपचार व इतर शस्त्रक्रिया करण्याची तरतुद राज्यातील बहुतांश मोठी खाजगी रुग्णालये गरीब रुग्णानसाठी २० टक्के सुट खाटा राखीव ठेवूनही रुग्णांवर उपचार करीत नसल्याचे गंभीर बाब शासनाकडे वेळोवेळी लक्षात आणून देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्या खाजगी रुग्णालयाना शासनाने कोट्यवधी रुपयांची जागा कर सवलती अदि सुविधा दिल्या असून त्याबद्दल्यात २० टक्के खाटा गरीब रुग्णावर उपचार करण्याची अट घातली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास शासनाने सुरू केलेली कॅशलेस योजनेअंतर्गत च्या खाजगी रुग्णालये गरीब रुग्णास यांनी ह्रदयरोगावर व इतर रुग्णांवर उपचार करताना अत्यंत कमी दर्जाचे उपकरणे वापरल्याने रुग्ण दगावण्याची शक्यता असल्याने या योजने अंतर्गत असलेल्या रुग्णालयांची शासनाने चौकशी केली वा करण्यात येत आहे काय ?

**डॉ. दीपक सावंत (०४-०७-२०१७) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत अंगीकृत रुग्णालयांना किमान २५ टक्के खाटा राखुन ठेवणे आवश्यक आहे.

या योजनेंतर्गत राज्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील १ लाखपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या रुग्णांना खाजगी रुग्णालयामध्ये उपचार देण्यात येत असून रुग्णांना खाटा उपलब्ध नसल्याच्या कारणांमुळे उपचार नाकारल्याबाबत आजपर्यंत २९ तक्रारी आल्या होत्या. परंतु त्यांचे तात्काळ निराकरण करण्यात आले आहे.
(३) महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० मधील कलम ४१कक तसेच या संदर्भात मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या न्याय निर्णयानुसार धर्मादाय खाजगी रुग्णालयातील एकुण कार्यान्वित खाटांपैकी १० टक्के खाटा निर्धन रुग्णांवर व १० टक्के खाटा आर्थिकदृष्टया

दुर्बल घटकांतील रुग्णांवर अनुक्रमे मोफत व सवलतीच्या दरात उपचार करण्याकरिता आरक्षित ठेवणे बंधनकारक आहे. सदर तरतुद ही उपरोक्त अधिनियमांतर्गत नोंदणी झालेल्या व सार्वजनिक न्यासांमार्फत संचलित धर्मादाय खाजगी रुग्णालयांसाठीच आहे.

(४) नाही.

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत सोसायटी व विमा कंपनी यांच्या मान्यतेने तयार करण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार अंगीकृत रुग्णालयांने शस्त्रक्रियेमध्ये/ उपचारादरम्यान FDA व RCI मान्यता प्राप्त उपकरणे (Stent, Valve, Implant & OT, instrument) वापरावती असे नमुद करण्यात आले आहे. रुग्णाच्या आरोग्यावर परिणाम करणाऱ्या निकृष्ट दर्जाच्या उपकरणांचा वापर करणेइत्यादीबाबी या योजनेंतर्गत निदर्शनास आलेल्या नाहीत.

---

**गिरिजा व दुधना नदी परिसरात नुकसान झालेल्या बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(९) ५८९९५ (२४-०८-२०१६). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरिजा व दुधना नदी परिसरात दिनांक १७ व १८ सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे बंधाऱ्याचे अतोनात नुकसान झाले असून या बंधाऱ्याची दुरुस्ती दिनांक ३१ मे, २०१६ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश मा.विधानसभा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य यांनी दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदेशानुसार सदर बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झाले आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२१-०६-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) औरंगाबाद व फुलंब्री तालुक्यामध्ये अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या ८२ बंधा-यांची दुरूस्ती करण्याची बाब उदभवली आहे. त्यापैकी लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, औरंगाबाद कार्यालयाने त्यांच्या विभागातील क्षतीग्रस्त ४२ कामांपैकी बिल्डा को.प.ब. या कामाची दुरूस्ती अशासकिय संस्थेमार्फत पूर्ण केली आहे. व जिल्हा परिषद,पाटबंधारे विभागाने त्यांच्या विभागातील क्षतीग्रस्त कामांची दुरूस्ती सन २०१६ च्या पावसाळी हंगामात खाजगी संस्था, अशासकिय संस्था व लोकसहभाग इ. कडून तात्पुरत्या स्वरूपात करून त्यामध्ये काही प्रमाणात पाणी साठा निर्माण केला आहे.

जालना लघुसिंचन विभागाने भोकरदन तालुक्यातील १०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या वजीरखेडा को.प. बं., शिरसगाव वाघुळ को.प.ब., बोरगाव तारू कोपब सर्व ता. भोकरदन ची तात्पुरती दुरूस्ती करून काही अंशी पाणी साठा निर्माण केलेला आहे. तरीसुदधा औरंगाबाद व जालना जिल्हयातील या सर्व ८५ बंधा-यांची कायमस्वरूपी दुरूस्ती करण्यासाठीचा प्रापण सूची मंजुरीचा प्रस्ताव शासनाचे विचाराधीन असून निधीच्या उपलब्धतेनुसार त्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

---

**राज्यात सन २०१३-१६ च्या आकडेवारीनुसार माता मृत्यूचे प्रमाण दरहजारी ६८ असल्याबाबत**

**(१०) ५९५७९ (३०-०८-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१३-१६ च्या आकडेवारीनुसार माता मृत्यूचे प्रमाण दरहजारी ६८ असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मातामृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे व मातामृत्यूची प्रमुख कारणे कोणती आहेत ती कमी करण्यासाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(३) असल्यास, मातामृत्यू कमी करण्याकरिता जनजागृती व अन्य आवश्यक उपाययोजना करण्याचे शासनाने योजिले आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२९-०६-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

रजिस्ट्रार जनरल, भारत सरकार यांच्या सन २०११-१३ च्या अहवालानुसार राज्यातील माता मृत्युचे प्रमाण हे ६८ प्रतिलक्ष जीवंत जन्म आहे.

(२) माता-मृत्युचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनामार्फत खालीलप्रमाणे योजनांची अंमलबजावणी करण्यात येते.

अ) जननी सुरक्षा योजना.
ब) जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम.
क) मानव विकास कार्यक्रम.
ड) मातृत्व अनुदान योजना.
इ) कुटुंब कल्याण कार्यक्रम.
ई) प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अनुदान योजना.

राज्यात होणारे माता मृत्यु हे प्रामुख्याने गरोदरपणातील उच्चरक्तदाव व झटके, अतिरक्तस्त्राव, जंतुदोष, तीव्ररक्तक्षय, कावीळ व गर्भाशय फाटणे इत्यादी कारणांनी होतात.

(३) होय.

ग्राम आरोग्य व पोषण दिनाच्या दिवशी सर्व गरोदर मातांचे आरोग्य सेविकेमार्फत समुपदेशन करण्यात येते, पोस्टर्स, बॅनर्स, रेडीओ व दूरदर्शन या माध्यमांद्वारेही जनजागृती करण्यात येते. तसेच जून २०१६ पासून दर महिन्याच्या ९ तारखेला प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व आरोग्य अभियानही राबविण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील स्थानिक ग्रामीण रुग्णालयात औषधांचा तुटवडा असल्याबाबत

**(११) ५९६३० (३०-०८-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील स्थानिक ग्रामीण रुग्णालयात औषधांचा व कर्मचाऱ्यांच्या तुटवडा निर्माण झाल्याने रुग्णांना सेवा मिळत नसल्यामुळे रुग्णांमध्ये तीव्र असंतोष पसरला असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२७-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.

ग्रामीण रुग्णालय, तिवसा, जिल्हा अमरावती येथे माहे मे, २०१६ मध्ये औषधांचा तुटवडा निर्माण झालेला नाही. माहे फेब्रुवारी, २०१७ अखेर सदर रुग्णालयातील २७ मंजूर पदांपैकी १९ पदे भरण्यात आलेली आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राजीव गांधी योजनेतून मिळणारा परतावा अपूरा असल्याबाबत

**(१२) ६१२४३ (३०-०८-२०१६). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील बहूतेक रुणालंयांच्या व्यवस्थापनानी राजीव गांधी योजनेतून मिळणारा परतावा अपूरा असल्याचे कारण दाखवून रुग्णांकडून पैसे घेतल्याचे माहे एप्रिल, २०१६ च्या सुमारास निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच अशा रुग्णांनी आपली तक्रार लावून धरली तर रुग्णालयांनी नेमलेल्या मार्केटिंग विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून रुग्ण कुटूंबावर रुग्णाच्या पुढे देखभालीची भीती दाखवून आपली कोणतीही तक्रार नाही, असे लेखी लिहून देण्यासाठी सक्ती केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व प्रकरणाची शासनाने कोणती चौकशी केली आहे काय, चौकशी नुसार रुग्णालय व्यवस्थापनांवर कोणती कारवाई केली किंवा करण्यात येणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२०-०६-२०१७) :** (१) नाही.

माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान वैद्यकीय निदान, औषधोपचार व इतर चाचण्यांसाठी रुग्णांनी स्वत: खर्च केल्याबाबतच्या कोल्हापूर जिल्हयात एकूण २३१ तक्रारी नोंदविण्यात आल्या होत्या. त्या सर्व तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे.

(२) नाही.

(३) कोल्हापुर जिल्हयातुन आतापर्यंत रुग्णांकडून अतिरिक्त पैसे घेतल्याच्या प्राप्त तक्रारींच्या पार्श्वभुमीवर दोन रुग्णालयांची मान्यता रद्द केली असून दोन रुग्णालयांचे निलंबन रद्द केले आहे.

इतर विविध कारणांच्या तक्रारींमुळे चार रुग्णालयांना कारणे दाखवा नोटीस टीपीए मार्फत (Third Party Administators) पाठविण्यात आलेल्या आहे याशिवाय योजनेचे दर मान्य नसल्यामुळे दोन रुग्णालयांची मान्यता त्यांच्या विनंतीनुसार रद्द करण्यात आली आहे.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) मध्यवर्ती रुग्णालयात पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप (पीपीपी) खाजगी कंपन्यांनी रुग्णालयात तोडफोड केल्याबाबत**

**(१३) ६४०६१ (३०-०८-२०१६). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने ३ वर्षापूर्वी पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप (पीपीपी) अंतर्गत शासकीय रुग्णालयातील रेडिओडायग्नोस्टिक सेंटर खाजगी कंपन्यांना चालविण्यासाठी मंजुरी दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मंजुरीनुसार सदर कंपनीने रुग्णालयात मोठ्या प्रमाणात तोडफोड केल्याने रुग्णाची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकारची तोडफोड उल्हासनगरातील (जि.ठाणे) मध्यवर्ती रुग्णालयात झाल्यामुळे तेथील रुग्णांचे हाल होत असल्यामुळे सदर रुग्णालय तातडीने दुरुस्त करण्याबाबत तेथील रहिवाशांनी मा. सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांकडे माहे मे, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनानुसार उल्हासनगरातील मध्यवर्ती रुग्णालय तसेच शासनाच्या इतर रुग्णालयाची दुरुस्ती तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (३०-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे.

राज्यातील निवडक २२ रुग्णालयांमध्ये सार्वजनिक खाजगी भागिदारी (पीपीपी) तत्वावर रेडिओलॉजी इमेजिंग डायग्नॉस्टिक सेंटर सुरु करण्याच्या दृष्टीने मे.विप्रो जी.ई.हेल्थ केअर प्रा.लि. यांच्यासमवेत दिनांक २०.१२.२०१२ रोजी करार करण्यात आला होता. सदरहू २२ रुग्णालयांमध्ये मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर या रुग्णालयाचा देखील समावेश होता.

तथापि, अडीच वर्षाच्या कालावधीत सदर प्रकल्पाच्या अमंलबजावणीबाबत या कंपनीकडून कार्यवाही न झाल्यामुळे दिनांक २०.१२.२०१२ रोजी करण्यात आलेला सदरचा करार नोव्हेंबर, २०१५ मध्ये रद्द करण्यात आला आहे.
(२) रेडिओलॉजी इमेजिंग डायग्नॉस्टिक सेंटर सुरु करण्याच्या दृष्टीने मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर येथील तळ मजल्यावरील बांधकामात मे.विप्रो जी.ई.हेल्थ केअर प्रा.लि. यांनी अंतर्गत फेरफार केला होता.
(३) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(४) मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर येथील तळ मजळ्यावरील प्लॅस्टर, फ्लोरींग, इत्यादी कामे करण्याकरीता उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उल्हासनगर यांच्याकडून खर्चाचे अंदाजपत्रक प्राप्त झाले असून त्यानूसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सुमारे दोन हजार रेडिओलॉजिस्ट बेमुदत संपावर गेल्याबाबत**

**(१४) ६४६१७ (३०-०८-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोणतेही बेकायदा काम न करणाऱ्या रेडिऑलॉजिस्टवर होत असलेल्या कारवाईविरुध्द रेडिओलॉजिस्ट असोसिएशनने दिनांक १४ जून, २०१६ पासून संप पुकारला, हे खरे आहे काय,
(२) अद्यापही या संपावर तोडगा न निघाल्यामुळे राज्यातील सुमारे दोन हजार रेडिओलॉजिस्ट दिनांक २० जून, २०१६ पासून बेमुदत संपावर गेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रेडिओलॉजिस्टच्या मागण्या कोणत्या आहेत, संपाच्या काळात रुग्णांचे हाल होऊ नये म्हणून रेडिओलॉजिस्टच्या योग्य त्या मागण्या मान्य करुन संप मिटविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२९-०६-२०१७) :** (१) कोणतेही बेकायदा काम न करणाऱ्या रेडिओलॉजिस्टवर कारवाई होत नाही. रेडिओलॉजिस्ट असोसिएशनने दि.१४.६.२०१६ ते दि.२१.६.२०१६ या कालावधीत संप केला होता. मात्र संप कालावधीत शासकीय, निमशासकीय व वैद्यकीय महाविद्यालयातील सोनोग्राफी केंद्रे चालू होती.
(२) हे खरे नाही.

राज्यातील खाजगी रेडिओलॉजिस्ट बेमुदत संपावर नसून दि. १४.०६.२०१६ ते २१.०६.२०१६ पर्यंत खाजगी सोनोग्राफी केंद्रे बंद होती.
(३) रेडिओलॉजिस्ट असोसिएशनने खालील मागण्यांसाठी संप केला होता.

१. समुचित प्राधिकारी यांच्याकडून होत असलेला नाहक त्रास थांबविणे.
२. एफ फॉर्म मधील क्लेरीकल चुका, ॲप्रॉन न घालणे, फलक न लावणे आणि पीसीपीएनडीटी कायद्याचे पुस्तक न ठेवणे हा गुन्हा लिंग निदान परिक्षण या समान समजू नये.

३. गुन्ह्याच्या स्वरुपानुसार शिक्षेचे स्वरुप ठरवावे.

४. किरकोळ चुकांसाठी मशिन सिल करु नये.

वरील मागण्यांच्या संदर्भात शासनाने रेडिओलॉजिस्ट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा केली व संप मिटविण्यात आला.

---

**शासकीय मनोरुग्णालयातील रुग्णांची सोयी-सुविधेअभावी दयनीय अवस्था झाल्याबाबत**

**(१५) ६५३२६ (१०-०१-२०१७). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय मनोरुग्णालयांमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या महिला मनोरुग्णांची पुरेशा सोयी-सुविधा व उपचाराअभावी दयनीय अवस्था असल्याचे माहे सप्टेबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय महिला आयोग आणि "नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ मेंटल हेल्थ ॲण्ड न्यूरोसायन्सेस" यांनी सन २०१५-१६ मध्ये तयार केलेल्या अहवालात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आह काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तद्नुसार शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२२-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) पुणे येथील प्रादेशिक मनोरुग्णालयाबाबत राष्ट्रीय महिला आयोगाने दिलेल्या पत्रात, कर्मचाऱ्यांची उपलब्धता व प्रशिक्षण, इमारतीची दुरावस्था, प्राथमिक सोयी सुविधा, कर्मचारी प्रशिक्षण, नातेवाईकांना पत्र लिहिणे, सॅनेटरी नॅपकीन उपलब्ध करुन देणे, प्रत्येकाला गणवेशाऐवजी वेगवेगळे कपडे देणे, रुग्णालयाला स्वायत्तता, रुग्णांना औषधोपचाराची माहिती देणे इ. बाबी नमूद करण्यात आल्या आहेत.

(३) व (४) राष्ट्रीय महिला आयोग आणि नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ मेंटल हेल्थ अँड न्यूरोसायन्सेस यांच्या उपरोक्त नमूद पत्रातील उपाययोजना करण्याबाबत विशेष तज्ञांची समिती गठीत करण्यात आली आहे. प्रादेशिक मनोरुग्णालय पुणे व ठाणे येथील रिक्त पदे भरणे, तसेच इमारतीच्या बांधकामाबाबतची कार्यवाही प्रगती पथावर आहे. सदर मनोरुग्णालयात स्त्री रुग्णांना त्यांच्या आवश्यकतेनुसार आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करुन देणे, रुग्णांच्या मनोरंजनाची व्यवस्था करणे, विविध सण साजरे करणे, मनोरुग्णालयातील अधिकारी कर्मचारी यांचे प्रशिक्षण घेणे, रुग्णांचे पुनर्वसन करणे इ. बाबी पार पाडल्या जातात. टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस यांच्या संयुक्त विद्यमाने प्रादेशिक मनोरुणालय,ठाणे येथे “तराशा” कार्यक्रमान्वये १४ स्त्री आंतररुग्णांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. महिला

व्यवसायोपचार तज्ञांच्या मदतीने महिला रुग्णांकडून विविध कलाकौशल्याचे साहित्य तयार करुन घेणे त्याची विक्री करणे या प्रक्रियाही पार पाडल्या जातात.प्रादेशिक मनोरुग्णालय पुणे व ठाणे येथील आंतररुग्णांचे आधार कार्ड काढण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मुंबईसह राज्यातील खारफुटी संरक्षण विभागामध्ये अपुरे कर्मचारी असल्याबाबत

**(१६) ६५६२५ (१४-०२-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईसह राज्यातील खारफुटीच्या रक्षणासाठी उभारण्यात आलेल्या खारफुटी संरक्षण विभागामध्ये अपुरे कर्मचारी असल्याने खारफुटी धोक्यात आल्याचे माहे सप्टेंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, सागरी किनाऱ्यावरील खारफुटीवर झोपडपट्ट्या व बांधकाम विकासकांकडून मोठ्या प्रमाणात अतिक्रमण होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खारफुटी वाचविण्याबाबत तसेच खारफुटी संरक्षण विभागामध्ये रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही,

मुंबईसह राज्यातील कांदळवन क्षेत्राचे व्यवस्थापन व संवर्धनासाठी कांदळवन कक्ष, मुंबई या स्वतंत्र कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे. सदर कांदळवन कक्षासाठी मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई यांच्या अधिपत्याखाली नवीन ३७ पदांची निर्मिती करण्यात आली. तद्‌नंतर मुंबई कांदळवन संधारण घटकासाठी ३० पदे या कक्षाकडे वर्ग करण्यात आली. या व्यतिरिक्त सावंतवाडी वन विभागातील १८, चिपळून वन विभागातील ३ व डहाणू वन विभागातील ३ असे प्रादेशिक विभागातील एकूण २४ कर्मचारी कांदळवनाच्या संरक्षणासाठी कार्यरत आहेत.
(२) सागरी किनाऱ्यावरील खारफुटींवर काही ठिकाणी झोपडपट्ट्यांचे बांधकाम आढळलेले आहे. परंतु बांधकाम विकासकांकडून वन विभागाच्या ताब्यातील कांदळवन क्षेत्रावर अतिक्रमण झालेले नाही.
(३) मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई या महापालिकेच्या हद्दीतील कांदळवन क्षेत्राचे प्रभावी व्यवस्थापन तसेच कांदळवन कक्षाच्या बळकटीकरण करण्यासाठी कांदळवन संधारण घटक (Mumbai Mangrove Conservation Unit) ची निर्मिती झाली आहे.

कांदळवन कक्षाने जादा कर्मचारी वर्ग मिळण्याबाबत केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासन पत्र दिनांक१९.१०.२०१६ अन्वये प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र

राज्य, नागपूर यांना वन विभागात इतरत्र कार्यरत जादाची पदे पुनर्विनियोजन (redeployment) द्वारे कांदळवन कक्षास उपलब्ध करुन देणेबाबत निर्देश देण्यात आले असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

कांदळवन संरक्षित क्षेत्रात वन विभागामार्फत नियमित गस्त करुन खारफुटीच्या झाडांची तोड होऊ नये तसेच त्यावर भराव होणार नाही, याकरिता सर्वतोपरी दक्षता घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रायगड जिल्हयात सर्प व विंचू दंशाचे प्रमाण वाढत असल्याबाबत**

**(१७) ६५८२७ (१०-०१-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयात सर्प व विंचू दंशाचे प्रमाण अलिबाग तालुक्यात मोठयाप्रमाणात असून पनवेल, कर्जत, खालापूर, महाड, माणगांव या तालुक्यांमध्ये सर्प व विंचूदंश प्रमाण वाढत असल्याचे माहे सप्टेंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे एप्रिल २०१५ ते ऑगस्ट २०१६ या १७ महिन्यात २६६४ जणांना सर्पदंश तसेच ३३६७ जणांना विंचूदंश झाला असून सहा जण मृत्यु पावले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून विंचू व सर्प दंशामुळे होणारे मृत्यु टाळण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२२-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. माहे एप्रिल-२०१५ ते ऑगस्ट,२०१६ या कालावधीत ३४८ जणांना सर्पदंश तसेच १९३५ जणांना विंचुदंश झालेला आहे. परंतु एकही व्यक्तीचा मृत्यू झालेला नाही.

(३) रायगड जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रात सर्पदंश व विंचुदंशासाठी आवश्यक लसीचा पुरेसा साठा उपलब्ध करुन देण्यात आलेला असून त्याचा नियमित आढावा घेतला जातो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयात राजीव गांधी जीवनदायी योजनेचे १०० टक्के कार्ड वाटप न झाल्याबाबत**

**(१८) ६५८३१ (२७-०१-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एक लाखाच्या आत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबाचा दोन लाखापर्यंतचा उपचार खर्च भागविण्यासाठी शासनाने राजीव गांधी जीवनदायी योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यात राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेची मुदत संपत आली तरी त्याचा लाभ मिळविण्यासाठीच्या आरोग्य कार्डाचे १०० टक्के वाटप झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन आता महात्मा फुले यांच्या नावाने नव्याने सुरु होणाऱ्या योजनेचे कार्ड १०० टक्के वाटप होण्यासाठी कार्यवाही करणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२०-०६-२०१७) :** (१) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत राज्यातील दारिद्रय रेषेखालील तसेच दारिद्रय रेषेवरील वार्षिक एक लाखापर्यंत उत्पन्न असलेल्या शिधापत्रिकाधारक कुटुंबांना तसेच शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्हयांतील शुभ्र शिधापत्रिकाधारक शेतकरी कुटुंबांच्या वैद्यकीय उपचारांसाठी आरोग्य विमा संरक्षण पुरविण्यात येते. या योजनेंतर्गत प्रति वर्ष /प्रति कुटुंब रु.१.५० लाख व मुत्रपिंड प्रत्यारोपणासाठी रु. २.५० लाख इतके विमा संरक्षण उपलब्ध करुन देण्यात आले आहे.
(२) कोल्हापुर जिल्ह्यात राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत आतापर्यंत ७,२५,२९० इतकी आरोग्य ओळखपत्रे वाटप करण्यात आली आहेत. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून शिधापत्रिकांचा अचुक डिजीटाईज्ड डाटा प्राप्त होईपर्यंत सदर योजनेंतर्गत आरोग्य ओळखपत्र छपाई व वितरण कार्यवाही दि. ३० मे, २०१५ पासुन स्थगित ठेवण्यात आली आहे.

ज्या पात्र लाभार्थ्यांना आरोग्य ओळखपत्र प्राप्त झालेले नाही, अशा लाभार्थ्यांना वैध पिवळे, अंत्योदय, अन्नपुर्णा शिधापत्रिका व केशरी (रु.१ लाख पर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या) शिधापत्रिका आणि फोटो ओळखपत्राच्या आधारे योजनेच्या अंगीकृत रुग्णालयामध्ये मोफत उपचार घेण्याची मुभा देण्यात आली आहे.
(३) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात राबविण्याचे प्रस्तावित असून शासन निर्णय क्र. रागांयो-२०१४/प्र.क्र.२०३/आ-६ दि. १६.०९.२०१६ अन्वये लाभार्थी कुटुंबास आरोग्य ओळखपत्र देण्याकरिता समिती स्थापन करण्यात आली असून समितीच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जालना जिल्हयातील जलयुक्त शिवार अभियानांतर्गत झालेल्या कामाचा ऑडिटबाबत

**(१९) ६६०४५ (१६-१२-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्हयातील जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१५ व २०१६ या दोन वर्षात झालेल्या कामांचे नाबार्ड कन्सल्टन्सी सव्हिसेस (नॅबकॉन्स) या त्रयस्थ संस्थेमार्फत ऑडिट करण्यात येणार होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलयुक्त शिवार अभियोजनेतंर्गत झालेल्या कामांचा संबंधिती संस्थेमार्फत ऑडिट करण्यात आले आहे काय,
(३) असल्यास, संबंधित ऑडिट अहवालामध्ये कोणते दोष आढळुन आले आहेत,
(४) असल्यास, संबंधित दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**प्रा. राम शिंदे (०३-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) होय.
(३) ९५ टक्के पेक्षा अधिक कामे समाधानकारक आढळली आहेत व ५ टक्केहून कमी कामात त्रुटी आढळून आल्या आहेत.
(४) किरकोळ त्रुटी असलेली कामे दुरूस्ती करावीत आणि गंभीर त्रुटी आढळलेल्या कामांशी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या विरूद्ध कारवाई करून अनुपालन अहवाल सादर करण्याच्या सूचना संबंधित कार्यान्वयीन यंत्रणा प्रमुखांना देण्यात आल्या आहेत.

---

**जलयुक्त शिवार योजनेतंर्गत डोंगरपठारावरील गांवाचा समावेश करणेबाबत**

**(२०) ६६२८५ (१६-१२-२०१६). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जलयुक्त शिवार योजनेतंर्गत सातारा जिल्हयामध्ये दुसऱ्या टप्प्यात २१० गांवाचा समावेश करण्यात आला असून डोंगरी व दुर्गम तालुका असणाऱ्या पाटण तालुक्यातील केवळ ८ गांवाचा समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जलयुक्त शिवार योजनेतंर्गत गावांच्या निवडी करताना डोंगरी भागातील डोंगरपठारावर वसलेल्या गांवाचा विचार करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डोंगरपठारावरुन पावसाळयाचे वाहून जाणारे पाणी अडविण्याकरीता या योजनेत समावेश करावा अशी ग्रामस्थांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त योजना समाविष्ठ झाली नसल्याने लोकांच्यामध्ये तीव्र नाराजी पसरली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, जलयुक्त शिवार योजनेतंर्गत समाविष्ठ करण्याकरीता शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व अद्यापही निर्णय घेतला नसल्यास निर्णय न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०३-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही.
जलयुक्त शिवार अभियानांतर्गत पाटण तालुक्यातील एकूण ०९ गावांची निवड करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत गाव निवड करण्याकरिता जलसंधारण विभाग शासन पत्र दि.०२ जानेवारी, २०१५ व दि.१४ ऑगस्ट, २०१५ अन्वये जलयुक्त शिवार अभियान गाव निवड निकष ठरविण्यात आले आहेत.

(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यात देहविकी करणाऱ्या आणि डान्सबारमध्ये काम करणाऱ्या २०५ महिलांना गेल्या तीन वर्षात एडस या आजाराची लागण झाल्याबाबत**

**(२१) ६६७१८ (१०-०१-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यात देहविकी करणाऱ्या आणि डान्सबारमध्ये काम करणाऱ्या २०५ महिलांना गेल्या तीन वर्षात एडस या आजाराची लागण झाल्याचे नुकतेच माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये शासकीय आकडेवारीवरुन निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आजारास आळा बसण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२३-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) ठाणे जिल्ह्यात अशासकीय संस्थांमार्फत देह विक्री करणाऱ्या महिलांसाठी एकूण १२ प्रकल्प नॅको, नवी दिल्ली या संस्थेच्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणे राबविण्यात येतात. या प्रकल्पांतर्गत देहविक्री करणाऱ्या महिलांकरीता त्यांची एचआयव्ही संदर्भातील जोखीम कमी करण्यासाठी खालील उपाययोजना करण्यात येतात.
अ) स्वभाव परिवर्तनसाठी समुपदेशन
ब) दर तिमाही मोफत गुप्तरोग तपासणी
क) दर सहामाही मोफत एचआयव्ही तपासणी
ड) मोफत कंडोमचा पुरवठा.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खडकवासला (ता.हवेली, जि.पुणे) अंतर्गत सिंहगड-खानापूर भागात "रॅबीपूर" या प्रतिबंधात्मक लसीचा तुटवडा असल्याबाबत**

**(२२) ६७३५७ (१०-०१-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खडकवासला (ता.हवेली, जि.पुणे) अंतर्गत सिंहगड-खानापूर भागात "रॅबीपूर" या प्रतिबंधात्मक लसीचा मोठ्याप्रमाणात तुटवडा असल्याची गंभीर बाब माहे सप्टेंबर २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हवेली तालुक्यातील बहुतांश गावातील रुग्णांना दूरच्या अंतरावरील ससून अथवा खाजगी दवाखान्यात जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, "रॅबीपूर" या प्रतिबंधात्मक लसीचा तुटवडा पुणे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आरोग्य विभाग केंद्रात अनेक दिवसांपासून असताना त्याकडे जिल्हा परिषद आरोग्य विभाग पूर्णपणे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संदर्भात जिल्हा परिषदेकडून होत असलेल्या दुर्लक्षामुळे रुग्णांचे आर्थिक नुकसान होत आहे याबाबत शासन स्तरावर सखोल चौकशी करून कोणती कार्यवाही करण्यात आली अथवा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२७-०६-२०१७) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

सिंहगड-खानापूर परिसरामध्ये खडकवासला व खानापूर येथे प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यरत आहेत. सदरहू दोन्ही प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये रॅबीपूर लस उपलब्ध होती.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील एचआयव्ही बाधित युवकांच्या कायमस्वरुपी पुनर्वसनाबाबत

**(२३) ६७५२७ (१०-०१-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), डॉ.आशिष देशमुख (काटोल), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात तीन लाखापेक्षा जास्त एचआयव्ही संक्रमण रुग्ण असून त्यामध्ये सुमारे एक लाख ६३ हजार पुरुष व १ लाख ४३ हजार महिलांचा समावेश आहे, तसेच राज्यात ० ते १८ वयोगटातील सुमारे २३ हजार बालके एचआयव्ही सहजीवन जगत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एड्स बाधित युवकयुवतींच्या पुनर्वसनासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२७-०६-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेअंतर्गत माहे डिसेंबर, २०१६ अखेर एचआयव्ही सह जगणाऱ्यांमध्ये नोंदणीकृत रुग्ण ३,६९,१८८ असून त्यापैकी १,८३,६०८ पुरुष, १५९९७७ स्त्रीया व २४८३१ बालके आहेत.

(२) महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेमार्फत एड्स बाधित युवकयुवतीच्या पुनर्वसनासाठी स्वंतत्र उपाययोजना नाही. परंतु शासनाच्या अटी व शर्तीतील निकष विचारात घेऊन अनुज्ञेयतेनुसार नागरिक म्हणून देय योजनाचा लाभ घेता येतो. सदर लाभ सोयिस्कररित्या रुग्णांना मिळावा यासाठी एकखिडकी योजना देखील एआरटी केंद्र व डापकू स्तरावर सुरु करण्यात आली आहे. सद्य:स्थित शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेत असलेल्या लाभार्थ्यांची संख्या २,१४,२२८ इतकी आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तळेगाव व ब्राम्हणगाव (ता.दिंडोरी, जि.नाशिक) येथे जलयुक्त शिवार योजनेंतर्गत पाझर तलावाच्या दुरुस्तीस सुरुवात केली नसल्याबाबत.

**(२४) ६७७४४ (१६-१२-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिंडोरी तालुक्यातील (जि.नाशिक) तळेगाव येथे जलयुक्त शिवार योजनेंतर्गत पाझर तलावाच्या दुरुस्तीचे काम एका ठेकेदाराने कार्यारंभ आदेश घेऊन दिड महिना उलटला तरी कामास सुरुवात केली नसल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ब्राम्हणगाव येथे जलयुक्तची दोन कामे लोकप्रतिनिधींनी सूचविण्यात आली असताना आणि ती कामे जलयुक्त शिवार आराखडयात समाविष्ठ असताना नाकारण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न (१) नुसार सदर तलावाच्या दुरुस्तीस विलंब करणाऱ्या ठेकेदारावर शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रश्न (२) नुसार शासनाने चौकशी करुन ब्राम्हणगाव येथील जलयुक्त शिवारची दोन्ही कामे सुरु करणबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०३-०७-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) मुळ मुदतीत कंत्राटदाराने काम सुरू न केल्यामुळे कंत्राटदारास रू.९२२६७/- दंड आकारण्यात आला आहे. तथापि, तळेगाव वणी ता.दिंडोरी या गावाचा पाणी ताळेबंद १०० टक्के पूर्ण झाल्याने अध्यक्ष तालुका जलयुक्त शिवार समिती तथा उपविभागीय अधिकारी, दिंडोरी यांनी आढावा सभेत सदरचे काम वगळण्याची शिफारस केली होती. त्याअनुषंगाने सदरचे काम वगळण्यात आले आहे.

(४) जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत सन २०१५-१६ व सन २०१६-१७ मध्ये ब्राम्हणगाव गावाचा समावेश नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पॅथॉलॉली लॅबकडून आजाराची निश्चित करण्याची रॅपिड टेस्ट न करण्याच्या आदेशाबाबत**

**(२५) ६८२८३ (२७-०१-२०१७). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पॅथॉलॉजी लॅबकडून आजाराची निश्चित करण्याची रॅपिड टेस्ट करू नये असे आदेश शासनाने दिनांक २८ सप्टेंबरच्या जीआर मध्ये म्हटल्याचे निष्पन्न झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच नियमांचे पालन न करणाऱ्या लॅबवर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तथापी सदर कारवाई बाबतची निश्चित अधिकार व विभाग याबाबत स्पष्टता नसल्याने सदर जीआरची अंमलबजावणी होत नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास याबाबत शासन योग्य कार्यवाही करणार आहे काय, असल्यास, त्याचा निश्चित कालावधीत किती ?

**डॉ. दीपक सावंत (२९-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे.

केंद्र शासनाच्या क्र.७-१६५/२०१६/NVBDCP/ DEN, दिनांक ९ जून, २०१६ च्या अधिसूचनेद्वारे डेंग्यू आजाराच्या निदानासाठी NS१ ELISA व MAC ELISA या तपासण्या करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच डेंग्यू आजाराच्या निश्चित निदानासाठी रॅपिड डायग्नोस्टीक टेस्टचा वापर करण्यात येऊ नये, असे आदेश दिले आहेत. तसेच केंद्र शासनाच्या संचालक, राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम यांच्या दिनांक १८ जुलै, २०१६ च्या पत्रान्वये डेंग्यू निदानासाठी घेण्यात येणाऱ्या चाचण्यासाठी रु.६००/- पेक्षा जास्त शुल्क आकारु नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. त्यास अनुसरुन राज्य शासनाने दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित केले आहेत. परंतू सदर चाचणी प्राथमिक स्क्रिनिंगसाठी वापरण्यास मनाई करण्यात आलेली नाही.

सदर शासन निर्णयाचा मुख्य उद्देश डेंग्यू प्रयोगशाळा चाचणीसाठी खाजगी प्रयोगशाळा आकारत असलेल्या शुल्कावर नियंत्रण घालणे, हा आहे.

(२) सदर शासन निर्णयाचे पालन न करणाऱ्या लॅबवर निश्चित स्वरुपाची कारवाई करण्याबाबत शासन निर्णयात उल्लेख केलेला नाही

(३) हे खरे नाही.

(४) राज्यातील खाजगी प्रयोगशाळांवरील प्रभावी नियमनाचा विषय शासनाच्या विचाराधीन आहे

---

**मालेगाव (जि.वाशिम) तालुक्यातील ब्राम्हणवाडा येथील शेतशिवारामध्ये जलयुक्त शिवार योजनेचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(२६) ६८३६९ (१६-१२-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.वाशिम) तालुक्यात ब्राम्हणवाडा येथील शेतशिवारामध्ये जलयुक्त शिवार योजनेचे काम वर्षभरापासून अपूर्ण स्थितीत असून त्याबाबत विचारणा केली असता ठेकेदार दुर्लक्ष करीत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२८-०१-२०१७) :** (१) हे खरे नाही.

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१४-१५ मधील मौजे ब्राम्हणवाडा ता.मालेगाव येथील कामे माहे मे २०१५ अखेर पूर्ण करण्यात आलेली आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कडाव (ता.कर्जत, जि.रायगड) प्राथमिक आरोग्य केंद्रातील गैरसोयीबाबत**

**(२७) ६९८९८ (२७-०१-२०१७). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कडाव (ता.कर्जत, जि.रायगड) प्राथमिक आरोग्य केंद्रात आजूबाजूच्या ४५ गावे व १९ आदिवासी वाड्यातून औषध उपचारासाठी मोठ्या प्रमाणात रुग्ण वैद्यकीय उपचारासाठी येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केंद्रात औषधाचा अपूरा पुरवठा, कर्मचाऱ्यांची अपूरी संख्या केंद्राची गळकी इमारत तसेच आरोग्याच्या अपुऱ्या सुविधा यामुळे रुग्णांना अनेक अचडणीला समोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी पुढे काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२२-०६-२०१७) :** (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे. सदर प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी एकूण १५ मंजूर पदांपैकी १३ पदे भरलेली असून २ पदे रिक्त आहेत. पावसाळयात काही वेळा आंतररुग्ण कक्षात गळती होते. परंतु सदर इमारत दुरुस्तीची कार्यवाही जि.प.बांधकाम विभाग, अलिबाग यांच्याकडून सुरु आहे. तसेच सदर आरोग्य केंद्रास आवश्यक असलेला औषधाचा पुरेसा साठा उपलब्ध करुन देण्यात आला आहे. रुग्णांना मिळणाऱ्या आरोग्यविषयक सोयी सुविधांवर याचा परिणाम होत नसल्याने त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो हे खरे नाही.

(४) प्राथमिक आरोग्य केंद्र इमारत दुरुस्तीकरिता रु. १० लाख अंतर्गत रस्ता बांधणीकरिता रु.५ लाख व विद्युतीकरणासाठी रु.६९ हजार इतक्या निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, बांधकाम विभाग जिल्हा परिषद अलिबाग यांच्याकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई, विरार, नालासोपारा आणि नायगाव या चार शहरांना जोडणाऱ्या रिंगरुट प्रकल्पाबाबत**

**(२८) ६९९७५ (१६-०१-२०१७). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई, विरार, नालासोपारा आणि नायगाव या चार शहराना जोडणारा रिंगरुट प्रकल्प शासनाने एमएमआरडीएच्या माध्यमातून पुर्ण करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी वसई-विरार शहर महानगरपालिकेने या वर्षीच्या अर्थसंकल्पात तरतूद केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पाचा अहवाल एमएमआरडीएने तयार करुन मंजूरीसाठी शासनाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्तावाला मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०७-२०१७) :**(१) होय.

(२) वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात रिंगरुटच्या बांधकामाची अनुषंगिक कामे जसे की, सर्वेक्षण खर्च, सिमांकन करणे, जागा संरक्षित करणे इत्यादी कामांसाठी सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात रु.१.०० कोटीची तरतूद वसई-विरार महानगरपालिकेने केली आहे.

(३), (४) व (५) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात वसई, विरार, नालासोपारा व नायगांव या शहरांना जोडणारा पूर्व व पश्चिम असा रिंग रोडचे प्राथमिक सर्वेक्षण व अंदाजपत्रक (सविस्तर प्रकल्प अहवाल) वसई-विरार शहर महानगरपालिकेने तयार केले असून सदर सविस्तर प्रकल्प अहवाल महानगरपालिकेने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे

सादर केला आहे. सदर प्रकल्पापैकी पश्चिम बाजूस असणारा नायगांव, वसई-विरार, नालासोपारा या शहरांना जोडणाऱ्या रस्त्याचे काम अंदाजित रक्कम रुपये ११२६.०० कोटीचे असून या कामाचा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या प्रस्तावित कामाच्या यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे.

---

**तुळजापूर (जि.उस्मानाबाद) तालुक्यात अत्याचार आलेल्या मुलीवर जिल्हा आरोग्य विभागाचे उपचार न केल्याबाबत**

**(२९) ७००२५ (१०-०१-२०१७). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळजापूर तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) एका गावात सहा वर्षे वयाच्या मुलीवर दिनांक १३ ऑगस्ट, २०१६ रोजी अत्याचार केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे ऑगस्ट अखेर पिडीत मुलीवर जिल्हा आरोग्य यंत्रणेने उपचार न केल्याने अत्याचाराच्या ठिकाणी जखमा झालेल्या जागी जंतुसंसर्ग झाल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशी काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२२-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) रुग्ण रुग्णालयात दाखल झाल्यानंतर रुग्णावर उपचार करण्यात आलेले आहेत. विषयांकित प्रकरणी संचालनालयास तसेच उपसंचालक स्तरावर तक्रार प्राप्त झालेली दिसून येत नाही त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिरनेर व कारंजा (ता.उरण, जि.रायगड) परिसरातील डोंगराळ भागात हत्ती रोगाची लागण**

**(३०) ७००७३ (१०-०१-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिरनेर व कारंजा (ता.उरण, जि.रायगड) परिसरातील डोंगराळ भागात हत्ती रोगाला कारणीभूत ठरणाऱ्या क्युलेक्स या डासांची वाढ झाल्यामुळे या परिसरातील अशाप्रकारच्या आजाराची लक्षणे असलेल्या रुग्णांची वाढ होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाढत्या घाणीच्या साम्राज्यामुळे उरण तालुक्यात डासांची पैदास वाढली असून त्यामुळे हत्ती रोगासारख्या असाध्य व्याधीची लागण होणाऱ्या रुग्णांची संख्या वाढू लागली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार तातडीची प्रतिबंधक उपाययोजना म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२९-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.

चिरनेर गावामध्ये सन २०१५ मध्ये २० व सन २०१६ मध्ये २० तसेच कारंजा या गावामध्ये सन २०१५ मध्ये २१ व सन २०१६ मध्ये २१ हत्तीरोग रुग्ण आढळले.

ऑगस्ट २०१५ मध्ये मौजे चिरनेर येथे हत्तीरोगाच्या निदानासाठी १३२ रक्तनमुने व मौजे कारंजा येथील ९२ रक्तनमुने संकलित करुन ते हत्तीरोगासाठी तपासले असता निर्जंतुक आढळून आलेले आहेत.

(२) हे खरे नाही,

उरण तालुक्यात हत्तीरोगाच्या संख्येत कोणतीही वाढ झालेली नाही

(३) चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

मात्र दरवर्षी दि.१६ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत हत्तीरोग रुग्ण शोध मोहिम राबविण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

हत्तीरोग दूरीकरणासाठी शासन स्तरावर खालील उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

• हत्तीरोग रुग्णांना उपचार.

• डासोत्पत्ती स्थानांवर अळीनाशकाची फवारणी करण्यात येते, तसेच डबकी बुजविणे, वाहती करणे, व्हेंट पाईपांना जाळया बसविणे या उपाययोजना केल्या जातात.

• जीवशास्त्रीय उपाययोजनेअंतर्गत गप्पीमासे पैदास केंद्राची निर्मिती करुन योग्य अशा डासोत्पत्ती स्थानांमध्ये अळीभक्षक गप्पीमासे सोडण्यात येतात.

• किटक समांहारकांमार्फत किटकशास्त्रीय सर्वेक्षण नियमितपणे करण्यात येत आहे.

• हत्तीपाय रुग्णांच्या बाधित अवयवांची देखभाल व निगा राखणेसाठी व्यवस्थापनाचे प्रशिक्षण प्रत्येक रुग्णाला दिले जाते.

• अंडवृध्दी रुग्णांची शस्त्रक्रिया करण्यासाठी जिल्हा रुग्णालयात शिबीरांचे आयोजन केले जाते.

• दरवर्षी दि.१६ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत हत्तीरोग रुग्ण शोध मोहिम राबविण्यात येते.

• हत्तीरोगाविषयी आरोग्य कर्मचारी व प्रसिध्दी माध्यमे यांचेमार्फत जनतेस आरोग्य शिक्षण देण्यात येते.

---

**किनवट येथील उपरुग्णालयातील अधिक्षक व माहूर तालुक्यातील (जि.नांदेड)**
**उपजिल्हा रुग्णालय ग्रामीण रुग्णालय व ट्रामा केअर मधील**
**डॉक्टर व कर्मचाऱ्याची रिक्त पदे भरणेबाबत**

**(३१) ७०६४७ (२७-०१-२०१७). श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट उपजिल्हा रुग्णालयातील अधिक्षक व माहूर तालुक्यातील (जि.नांदेड) येथील उपजिल्हा रुग्णालय ग्रामीण रुग्णालय व ट्रामा केअरमध्ये डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री, संचालक, उपसंचालक नांदेड यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ ऑक्टोबर, २०१५ रोजी व तद्नंतर अनेक वेळा सदर रिक्त पदे भरण्याची मागणी तोंडी व लेखी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार उपिजिल्हा रुग्णालय ग्रामीण रुग्णालय व ट्रामा केअर मधील रिक्त पदे भरणेबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२२-०६-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे, उपजिल्हा रुग्णालय, ट्रामा केअर युनिट व आश्रमशाळा पथक, गोकुंदा व ग्रामीण रुग्णालय, माहुर येथील गट-अ ते गट-ड संवर्गामध्ये एकूण १०० पदे मंजूर आहेत. त्यापैकी ६४ पदे भरलेली असून ३६ पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे आहे,

मा. लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार, रुग्ण सेवा बाधीत होवू नये म्हणून अधिपरिचारीकेची, औषध निर्माण अधिकाऱ्यांची, स्त्रीरोगतज्ञ व दंतशल्यचिकित्सकांची पदे कंत्राटी पध्दतीने भरुन त्यांच्या सेवा उपलब्ध करुन घेण्यात येत आहेत.

(३) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ मधील पदे पदोन्नतीने व नामनिर्देशनाने भरण्याची कार्यवाही सुरु असून, वैद्यकीय अधिकारी, गट-अ, ग्रेड पे ५४००/- मधील पदे जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्यामार्फत भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच वर्ग-३ व वर्ग-४ ची रिक्त पदे क्षेत्रिय स्तरावर भरण्यात येत आहेत.

(४) रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील शहापुरात राज्य शासनातर्फे राबविण्यात आलेल्या जलयुक्त शिवार अभियानाची चौकशी करण्याबाबत**

**(३२) ७०८९३ (१६-१२-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात जलयुक्त शिवार अभियानात समाविष्ट असणाऱ्या विविध विभागात बहुतांश कामे सुरु करण्यात आली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यात जलयुक्त शिवार योजनेतून कृषी, जलसंधारण व वन विभाग झालेल्या कामांची सखोल चौकशी करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बाब १ व २ नूसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने जलयुक्त शिवार योजनेतील कामे तात्काळ पूर्ण होण्यासाठी शासनाद्वारे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०३-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही.

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत शहापूर तालुक्यात विविध यंत्रणामार्फत दि.३१/०१/२०१७ अखेर १०२८ कामे पूर्ण करण्यात आली असून ६ कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जलयुक्त शिवार अभियानातील योजनेचे काम सुरु असताना करावयाचे मुल्यमापन**

**(३३) ७२८०४ (१६-१२-२०१६). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलयुक्त शिवार अभियानातील योजनेचे काम सुरु असताना करावयाचे मुल्यमापन (Concurrent Evaluation) ही प्रक्रिया जालना जिल्ह्यातील कामांच्या बाबत संबंधीत शासन निर्णयाच्या अनुषंगाने झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णयाप्रमाणे जलयुक्त शिवार अभियानातील योजनेचे काम सुरु असताना किमान दोन वेळेस मुल्यमापन करणे अपेक्षित असताना दिनांक १५ मे, २०१६ पर्यंत एकाही कामाचा मुल्यमापन अहवाल उपलब्ध नव्हता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेंतर्गत कामांचे त्रयस्त संस्थेकडून करावयाचे मुल्यमापन (Third Party Evaluation) अजुनही सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जलयुक्त शिवार योजनेची कामे अतिशय महत्वाची असून या कामांचा दर्जा तपासण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, शासन निर्णयात उल्लेख केल्याप्रमाणे मूल्यमापनाची प्रक्रिया करण्यात आली नसल्यास, शासनाने याबाबत चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) उपरोक्त बाब ४ व ५ बाबत अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२९-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) जालना जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत केलेल्या कामांची तांत्रिक तपासणी संबंधित विभागाव्यतीरिक्त अन्य विभागाकडून करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच प्रस्तुत कामांचे मूल्यमापन करण्यासाठी नॅबकॉन या त्रयस्थ संस्थेची निवड करण्यात आली होती. त्यानूसार या संस्थेने सर्व तालुक्यातील विविध यंत्रणेमार्फत झालेल्या ७२१ कामांचे मूल्यमापन केले आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यात राजीव गांधी जीवनदायी योजनेत समाविष्ट खाजगी हॉस्पिटल विरोधात ऑनलाईन तक्रारी बाबत

**(३४) ७३०६४ (१०-०१-२०१७). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यात राजीव गांधी जीवनदायी योजनेत समाविष्ट असलेल्या खाजगी रुग्णालयाविरोधात २१९ हून अधिक ऑनलाईन तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधीत तक्रारदार हॉस्पिटलवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०४-०७-२०१७) :** (१) हे खरे आहे.
कोल्हापुर जिल्हयामध्ये खाजगी रुग्णालया विरोधात योजनेंतर्गत दि. २१ नोव्हेंबर, २०१३ ते दि.८ फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत विविध प्रकारच्या एकुण ४०४ तक्रारी नोंदविण्यात आल्या आहेत.
(२) उपरोक्त ४०४ तक्रारींपैकी ३९५ (९८%) तक्रारींचे निराकरण करण्यात आलेले आहे. उर्वरित तक्रारींचे निराकरण करण्याची प्रक्रिया सुरु आहे. प्राप्त तक्रारींच्या पार्श्वभुमीवर कोल्हापुर जिल्हयातील २ रुग्णालयाचे (रामकृष्ण हॉस्पीटल व कृष्णा हॉस्पीटल) अंगीकरण रद्द करण्यात आलेले आहे. ४ रुग्णालयांचे निलंबन करण्यात आले होते. त्यापैकी २ रुग्णालयांनी (मोरया हॉस्पीटल व पायोस हॉस्पीटल) तक्रारींचे निवारण केल्यामुळे त्यांना पुन्हा अंगीकृत करण्यात आले आहे. सद्यस्थितीत २ रुग्णालये (निरामय हॉस्पीटल व मगदूम हॉस्पीटल) अदयाप

निलंबित आहेत. अन्य रुग्णालयांना तक्रारींबाबत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली असून तक्रारींचे निराकरण करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुर्डूवाडी (जि.सोलापूर) येथे मंजूर असलेल्या ट्रामा केअर युनिट चे काम निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(३५) ७३२३४ (१०-०१-२०१७). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुर्डूवाडी, (जि.सोलापूर) या शहराची लोकसंख्या ३०,००० असून तेथे मध्य रेल्वेचे जंक्शन व मराठवाड्याचे प्रवेशव्दार म्हणून परिचीत आहे, या ठिकाणी तातडीच्या रूग्णसेवेसाठी मोठे रूग्णालय कार्यान्वित नाही, त्यामुळे सदर ठिकाणी शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग संकिर्ण - १४१/आरोग्य-३, दिनांक १७ जानेवारी २०१३ अन्वये शासनाने मंजूरी दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ट्रामा केअर सेंटर साठी मंजूरी मिळुन तीन वर्षाचा कालावधी झालेला असतानाही अद्याप पर्यंत उभारणीचे काम हाती घेण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) सदरहु ट्रामा केअर सेंटरचे उभारणीचे काम सुरू करून रूग्णालय कार्यान्वित करणेसाठी शासनाने निधीची तरतुद करून किती कालावधी मध्ये काम पुर्ण करणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२३-०६-२०१७) :** (१) मौजे कुर्डुवाडी, (ता.माढा, जि.सोलापूर) येथील ग्रामीण रुग्णालयात ट्रामा केअर युनिट स्थापन करण्यास शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग संकिर्ण-१४१/आरोग्य-३, दिनांक १७ जानेवारी, २०१३ अन्वये शासनाने मंजूरी दिलेली आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून याबाबतची अंदाजपत्रक व आराखडे प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अंदाजपत्रक व आराखडे प्राप्त झाल्यानंतर प्रशासकीय मान्यता देण्याबाबत व निधी उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इलेक्ट्रोहोमिओपॅथी हा व्यवसाय करण्यासाठी निसर्गोपचार वैद्यकीय परिषदेद्वारे नोंदणीकृत व्यावसायिक म्हणून मान्यता मिळणेबाबत**

**(३६) ७३३४६ (१६-१२-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बी.ई.एम.एस. (B.E.M.S.) पदवी धारक मा.मुंबई उच्च न्यायालय याचिका क्र. ५५२३/१९९५ तसेच सर्वोच्च न्या.याचिका १३३७/२००७ नुसार संबंधित पदवीधर महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टिशनर अॅक्ट १९६१ या कायद्याच्या कलम २ च्या उपक्रम २ व ३ नुसार आपला व्यवसाय अधिकृतपणे करू शकतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पदवीधारकातील काही डॉक्टरांवर स्थानिक प्रशासनाने बोगस वैद्यकीय व्यावसायिक म्हणून नेवासा (अहमदनगर) पोलीस स्टेशनमध्ये डॉ. सुरेश वावले यांचेवर कारवाई करून अटक करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने इलेक्ट्रोहोमिओपॅथी हा व्यवसाय करण्यासाठी निसर्गोपचार वैद्यकीय परिषदेद्वारे नोंदणीकृत व्यावसायिक म्हणून मान्यता मिळावी यासाठी शासन स्तरावर काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०६-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या याचिका क्र. १३३७/२००७ नुसार इलेक्ट्रोपॅथी किंवा होमिओइलेक्ट्रोपॅथीची पदवी किंवा पदवीकाधारक, वैद्यकीय व्यवसायिक म्हणून नोंदणी न करता महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ च्या कलम २ च्या पोट-कलम २ नुसार संबंधित व्यवसाय करु शकतील. त्याचबरोबर संबंधितांनी स्वत:ला वैद्यकीय व्यवसायक म्हणून व्यवसाय करीत असल्याचा दावा करता येणार नाही आणि डॉक्टर किंवा तत्सम उपाधी लावू शकणार नाही.
(२) हे खरे नाही,

तथापि, दि. २७.१०.२०१६ रोजी अनिल आबासाहेब वाबळे वय ४६ वर्ष रा. अंतरवली ता. नेसावा हे श्री. गणेश क्लिनिक कुकाणा येथे त्यांचेकडे इलेक्ट्रोपॅथी पदवी असतांना त्यांनी अॅलोपॅथी औषधे वापरुन तशा प्रकारचे रुग्णांना उपचार देऊन रुग्णांची व शासनाची तसेच जनतेची दिशाभूल करुन फसवणूक केली आहे, असे निदर्शनास आल्याने त्यांचे विरुध्द नेवासा पोलीस स्टेशन गुरनं २९३/१६ भादंवि कलम ४२० सह महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ चे कलम ३३(१) प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील कांदिवली, चारकोप आणि बोरिवली गोराईतील खाडीकिनारी असलेली खारफुटी नामशेष होत असल्याबाबत

**(३७) ७५५६८ (१७-०४-२०१७). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील कांदिवली, चारकोप आणि बोरीवली गोराईतील खाडीकिनारी असलेली खारफुटी नामशेष होत असून तिथे बेकायदा झोपडया व टोलेजंग इमारती उभारल्या जात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिवसेंदिवस वाढणाऱ्या बेकायदा बांधकामाकडे तहसीलदार, वनखाते आणि महापालिकेचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०६-२०१७) :** (१) मुंबईतील कांदिवली २८.९५ हे., चारकोप ४५.३३०४ हे., बोरीवली ५२.०४ हे. व गोराई खाडीकिनारी ३.४६ हे. असे एकूण १२९.८८ हे. एवढे क्षेत्र भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम ४ अंतर्गत राखीव वने म्हणून अधिसूचित करण्यात आलेले आहे. सदरचे क्षेत्र वन विभागाच्या ताब्यात आहे. सदर क्षेत्रापैकी मौजे कांदिवली सर्वे क्र. १४९ न.भु.क्र. १ मधील ०.७ हे. अधिसूचित कांदळवन व कांदळवनापासून ५० मी क्षेत्रात ४९३ अनधिकृत झोपड्या असल्याचे निदर्शनास आले आहे. सदरचे अतिक्रमण हे सदरचे क्षेत्र वन विभागाकडे हस्तांतरीत करण्यापूर्वीचे आहे. मौजे बोरीवली येथील न.भु.क्र. ८८३ येथे ९ अनधिकृत अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आलेले आहे. सदरचे अतिक्रमण हे देखील क्षेत्र ताब्यात घेण्यापूर्वीचे आहे. मौजे चारकोप येथील वन विभागाच्या ताब्यातील क्षेत्रात अतिक्रमण झालेले नाही. याशिवाय कांदिवली, बोरीवली व चारकोप मधील वन विभागाच्या ताब्यातील क्षेत्रात टोलेजंग इमारती बांधल्याचे आढळून आलेले नाही.
(२) वन विभागाच्या ताब्यातील मौजे कांदिवली येथील सर्वे क्र. १४९ न.भु.क्र. १/ब मधील २१६ अनधिकृत झोपड्यांचे तात्काळ निष्कासन करण्यात आलेले आहे. उर्वरीत २७७ अनधिकृत झोपड्या या वन विभागाच्या क्षेत्रालगतच्या क्षेत्रात असल्याने उप अधिक्षक, भूमि अभिलेख, तालुका बोरीवली यांना हद्द निश्चित करुन देण्याकरिता विनंती करण्यात आलेली आहे. त्यांच्याकडून अहवाल प्राप्त होताच पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. तसेच बोरीवली येथील ९ अनधिकृत अतिक्रमणा विरुद्ध महसूल संहिता, १९६६ कलम ५३ व ५४ अंतर्गत नोटिसा देऊन दस्तावेजांची तपासणी करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) सखोल चौकशी करुन अनधिकृत अतिक्रमणावर तात्काळ कारवाई करण्यात आली आहे.
(४) अनधिकृत अतिक्रमण बांधकामा विरुद्ध वन गुन्ह्यांची नोंद करण्यात आलेली असून वन गुन्ह्याचा तपास चालू आहे. तसेच कांदळवनात अनधिकृत भराव करताना आढळून आलेले वाहन जप्त करुन भारतीय वन अधिनियम, १९२७ अंतर्गत कारवाई करण्यात येत आहे.
(५) कायदेशीर कारवाई वेळेत केल्यामुळे विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## पाटण (जि.सातारा) तालुक्यातील कोयना व सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाचे पुनर्वसन करण्याबाबत

**(३८) ७६३८२ (१५-०४-२०१७). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण (जि.सातारा) तालुक्यातील कोयना व सह्याद्री व्याघ्र प्रकल्पासाठी ज्या शेतकऱ्यांच्या शेतजमीनी संपादित करण्यात आल्या त्यांचे पुनर्वसन अद्याप करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन १९६७ पासून आतापर्यंत विस्थापित झालेल्या शेतकऱ्यांचे पुनर्वसन न करण्याची कारणे काय आहेत वा पुनर्वसनाबाबत शासनस्तरावरील पर्यायी उपाययोजनेची सद्यःस्थिती काय आहे,
(३) अद्याप पुनर्वसनाबाबत निर्णय घेण्यात आला नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०६-२०१७) :** (१) व (२) पाटण (जि.सातारा) कोयना व सह्याद्री व्याघ्र प्रकल्पतील ५ गावांपैकी पुनवली व किसरुळे या गावांनी पर्याय क्रमांक १ निवडला आहे. उर्वरित झाडोली व नहिंबे (आंबेघर, शिरशिंगे) गावांचे पलूस येथे व डिचोली गावाचे बाबरमाची येथे पूनर्वसन करण्यात आले असून नागरी सुविधांची कामे प्रगती पथावर आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यातील वृक्षलागवडीच्या योजनेचा अहवाल पाठविण्याबाबत**

**(३९) ७७२४३ (१७-०४-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यात लाखो रुपये खर्च करुन माहे जुलै, २०१६ मध्ये करण्यात आलेल्या वृक्षलागवडीचा योजनेचा अहवाल पाठविण्याबाबत संबंधिताकडे वारंवार मागणी करण्यात येऊनही अदयापी अहवाल पाठविण्यात आला नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वृक्ष लागवडीच्या योजनेचा अहवाल त्वरीत पाठविण्याबाबत तसेच सदरहू अहवाल पाठविण्यास दिरंगाई करणाऱ्या संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.
जुलै २०१६ मध्ये करण्यात आलेल्या वृक्षलागवडीच्या योजनेचा अहवाल पाठविण्याबाबत संबंधिताकडे कोणतीही मागणी करण्यात आलेली नाही. सदर वृक्षलागवड योजनेचा अहवाल २० कलमी कार्यक्रमाच्या मासीक अहवालाअंतर्गत नियमीतपणे मुख्य वनसंरक्षक, औरगाबाद यांना सादर करण्यात येतो. त्यानूसार जुलै २०१६ चा अहवाल दि.२८.११.२०१६ रोजी सादर करण्यात आला आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील चिखली तालुक्यात डोंगरशेवली परिसरातील रानडूकरांना जेरबंद करण्याबाबत**

**(४०) ७७९१९ (१५-०४-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील चिखली तालुक्यात डोंगरशेवली परिसरात रानडूकरांनी दोन शेतकऱ्यांच्या शेतातील मका खावून शेतकऱ्यांचे सुमारे २५ ते ४० हजारांचे नुकसान झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन येथील रानडुकरांना जेरबंद करण्यासोबतच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०६-२०१७) :** (१) होय हे खरे आहे.

बुलढाणा वनविभागातील बुलढाणा वनपरिक्षेत्रांतर्गत डोंगरखंडाळा वर्तूळामधील मौजे डोंगरशेवली परिसरात रानडुकरांनी दोन शेतकऱ्यांच्या १) श्री. शरद मारोती जवंजाळ व २) श्री. गजानन जगदेवराव सावळे, रा. डोंगरशेवली यांचे शेतातील मका खावून नुकसान केल्याची बाब दिनांक २६.०१.२०१७ रोजी त्यांचे निवेदनाचे अनुषंगाने निदर्शनास आली आहे. येथे रानडुक्करांनी शेतपिकांचे नुकसान केल्याच्या २ घटना निदर्शनास आली आहे.

(२) प्रकरणी प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार उक्त दोन्ही प्रकरणांती सुमारे ०.१५ हे. आर. वरील क्षेत्रात प्रत्यक्ष नुकसानी झाल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार श्री. शरद मारोती जवंजाळ यांना रु ४,२००/- व श्री. गजानन गजदेवराव सावळे यांना रुपये ४,१५०/- दिनांक २१.०४.२०१७ चे आदेशान्वये अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

डोंगरशेवली हा परिसर ज्ञानगंगा अभयारण्याला लागून असून, या परिसरात रानडुक्कर व रोही यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे हे तृणभक्षी प्राणी खाद्याच्या शोधात बाहेर पडतात व शेतीचे नुकसान करतात ही वस्तुस्थिती आह. त्याचप्रमाणे हे वन्यप्राणी वनक्षेत्रातच अधिवास करतात, अशीही परिस्थिती नाही. या सर्व वन्यप्राण्यांचा अधिवास शेती क्षेत्रातही आहे. त्यामुळे त्यांना जेरबंद करणे ही बाब वस्तुस्थितीस धरुन नाही.

सबब उक्त बाबीचे अनुषंगाने शेतपिकास धोकादायक ठरलेल्या रानडुक्कर व रोही यांना पारध करण्याबाबत सुलभीकरण होण्याचे दृष्टीने शासन परिपत्रक दिनांक २२.०७.२०१५ अन्वये मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पेंच व्याघ्र प्रकल्पांतर्गत उमरेड-कऱ्हांड अभयारण्यातील बेपत्ता असलेला जय नावाचा वाघ जिवंत असल्याबाबत**

**(४१) ७७९४६ (१८-०४-२०१७). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेंच व्याघ्र प्रकल्पांतर्गत उमरेड-कऱ्हांड अभयारण्यातील दिनांक १८ एप्रिल, २०१६ पासून बेपत्ता असलेला 'जय' नावाचा वाघ जिवंत असल्याची माहिती दिनांक २९ जुलै, २०१६ च्या व्याघ्रदिनी मा.मुख्यमंत्री आणि मा.वन मंत्री यांनी जाहिर केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या दोन वर्षात वाघांच्या शिकारीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने तब्बल ९ महिन्यानंतर जय वाघाची दखल घेतल्यानंतर त्याच्या मृत्युची शंका व्यक्त करण्यात आल्यानंतर केंद्रीय वने व पर्यावरण मंत्रालयाने स्थापन केलेली समिती नागपूरात चौकशीसाठी दिनांक २० जानेवारी, २०१७ रोजी दाखल झाली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशी समितीस काय आढळून आले आहे व शासनाने केंद्र शासनाने नव्याने जाहिर केलेल्या श्यामा प्रसाद मुखर्जी जन वन योजनेतील सौर कुंपनाची योजना स्विकृत केली आहे, हे ही खरे आहे,
(४) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०६-२०१७) :** (१) पेंच व्याघ्र प्रकल्पांतर्गतील उमरेड-कऱ्हांडला अभयारण्यातील बेपत्ता असलेल्या "जय" वाघाची शोध मोहिम विविध स्तरावर युध्दपातळीवर सुरु होती व तो पर्यत त्याचा मृतदेह आढळून न आल्यामुळे दिनांक २९.०७.२०१६ रोजीच्या व्याघ्र दिनी सदर जय वाघ हा जिवित असल्याचे मा. मुख्यमंत्री आणि मा. मंत्री (वने) यांनी जाहिर केले.
(२) केंद्रीय वने व पर्यावरण मंत्रालयाने स्थापन केलेली समिती दिनांक २०.०१.२०१७ रोजी नागपूरमध्ये आली होती हे खरे आहे.
(३) सदर समितीचा अहवाल प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना अप्राप्त आहे.

डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन योजनेमध्ये मानव वन्यप्राणी संघर्ष कमी करण्याच्या दृष्टीने अपारंपारीक ऊर्जा स्त्रोतांच्या वापरास चालना देण्याची तरतूद आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भंडारा जिल्हयातील कोका, नागझीरा, उमरेड व क-हांडला वन्यजीव अभयारण्यात मागील सहा वर्षात ३२ वन्य प्राण्याची शिकार करण्यात आल्याबाबत

**(४२) ७८१५६ (१७-०४-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्हयातील कोका, नागझीरा, उमरेड व कऱ्हांडला वन्यजीव अभयारण्यात मागील सहा वर्षात ३२ वन्य प्राण्याची शिकार करण्यात आल्याबाबतची बाब माहे जानेवारी, २०१७ दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वन विभागांतर्गत गेल्या ५ वर्षात दहा प्राण्याचा अपघाती मृत्यु झाला असुन ३२ प्राण्यांची शिकार तर २६ प्राणी अन्य नैसर्गिक कारणांमुळे मृत्युमुखी पडलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या वनपरीक्षेत्रात शिकारीवर निर्बंध घालण्याकरीता वनविभागाच्या खात्याकडुन अंमलबजावणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या वनपरीक्षेत्रात शिकार करणाऱ्या शिकाऱ्यांवर कोणती कारवाई करणार आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०६-२०१७) :** (१) व (२) भंडारा जिल्ह्यामधील नवेगाव-नागझिरा रखीव क्षेत्राअंतर्गत समाविष्ट असलेल्या कोका वन्यजीव अभयारण्य दिनांक १८.०७.२०१३ रोजी, नागझिरा अभयारण्य दिनांक २३.०७.२००१ रोजी व नविन नागझिरा अभयरण्य दिनांक २९.०२.२०१२ रोजी घोषीत करण्यात आले आहे. तसेच उमरेड-कऱ्हांडला अभयारण्याची घोषणा दिनांक २९.०६.२०१२ रोजी करण्यात आली आहे. त्यातील पवनी वन्यजीव क्षेत्राचा समावेश भंडारा जिल्ह्यात होतो.

उपरोक्त क्षेत्रात गेल्या पाच वर्षात घोरपड-१, चितल-१ अशा दोन वन्यप्राण्यांचा शिकारीने निलगाय-१ अपघाताने, रानडुक्कर-१, रानगवा-१, वाघ-१ व बिबट-२ असे एकूण ५ वन्यप्राण्यांचा मुत्यू नैसर्गिकरित्या झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) हे खरे आहे.
(४) वन्यप्राण्यांची शिकार करणाऱ्यावर वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अंतर्गत कलमान्वये कारवाई करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ठाणे व मुंबई या शहरांना जोडणारा अकोले तोलारखिंड रस्त्याचे काम वन विभागाची मान्यता न मिळाल्याने प्रलंबित राहिल्याबाबत

**(४३) ७८१८८ (१७-०४-२०१७). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे व मुबई या शहरांना जोडणारा अकोले तोलारखिंड हा जवळचा रस्ता असून वन विभागाची मान्यता न मिळाल्याने या रस्त्याचे काम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच चोंढे ते घाटघर रस्ताही ठाणे व मुंबई या मार्गाला जवळचा रस्ता आहे तथापि वनविभागाच्या मान्यतेअभावी याही रस्त्याचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्यांना वनविभागाची मान्यता मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०६-२०१७) :** (१) केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालय, नवि दिल्ली यांच्याकडून प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार कोतूळ तोलारखिंड रस्ता रा. मा. क्र. ४६ ता. अकोले भाग कोतुळ ते तोलारखिंड खिरेश्वर भुयारी मार्ग सर्व्हेक्षण करण्याबाबतचा प्रस्ताव तयार करुन विहीत मार्गाने सादर करण्याबाबत वनसंरक्षक (वन्यजीव), नाशिक यांनी दिनांक ०६.०९.२०१४ रोजीच्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांना कळविले आहे.

तसेच अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नाशिक यांनी अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर व नाशिक यांना देखील सदर प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने उप विभागीय अभियंता, सर्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांनी पुढील कार्यवाही करण्यास सहमती दर्शविली होती. तथापि ह्यांचेकडून अद्याप सदर प्रस्ताव Online सादर करण्यात आलेला नाही.

(२) चौंथे ते घाटघर रस्त्याबाबतचा कोणताही प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील शेतकऱ्यांच्या पिकाचे वनप्राण्यांमुळे**
**मोठया प्रमाणात नुकसान होत असल्याबाबत**

**(४४) ७८४३८ (१५-०४-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील शेतकऱ्यांच्या शेतात वनप्राण्यांचा सांबर, चितळ, हरीण व रानडुक्कर या प्राण्याचा हैदोसामुळे गहु, हरभरा, ज्वारी व अन्य पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान होत असल्याची बाब माहे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागातील शेतकरी वन्यप्राण्याचा हैदोसामुळे पुर्णता हवालदिल झाला असुन त्यांचा कायमचा बंदोबस्त वनविभागाद्वारे करण्याची मागणी तेथील शेतक-यांनी केली परंतु वनविभागाचे अधिकारी त्याकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भागातील शेतक-यांनी वन विभागाकडे सौर उर्जेचे कुंपण उपलब्ध करून देण्याची मागणी केली असुन अद्यापपर्यंत ते त्यांना उपलब्ध करून देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या भागातील शेतकऱ्यांचे वनप्राण्यापासुन होणाऱ्या नुकसानीची भरपाई वनविभागाकडून देण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०६-२०१७) :** (१) नागपूर जिल्ह्यात वन्यप्राण्यांमुळे शेतपिकांची नुकसानी भरपाई संबंधी ३८३६ प्रकरणे आर्थिक वर्ष २०१६-१७ दरम्यान वन विभागास प्राप्त झाली आहेत. तृणभक्षी वन्यप्राणी हे शेतपिकांच्या नुकसानीसाठी काही प्रमाणात कारणीभूत होतात ही वस्तुस्थिती आहे.

(२) रोही, रानडुक्कर व हरीण प्रजातीच्या वन्यप्राण्यांमुळे शेतपिकांचे नुकसान थांबवावे याबाबत सर्वसाधारणपणे निवेदने प्राप्त झाले आहेत. पेंच व्याघ्र प्रकल्पातगतच्य शेतकऱ्यांना ग्राम परिसर विकास समितीचे गठण करुन व्यक्तीश लाभार्थीला ७५% अनुदान व २५% स्वगुंतवणुकच्या धरतीवर सौर उर्जेचे कुंपण देण्याची योजना EDC मार्फत गावागावात राबविण्यात येत आहे. आजपावेतो १४० लाभार्थींना सौर उर्जा कुंपण देण्यात आलेले असून रु. १९,८०,४०८/- निधी खर्च करण्यात आला. त्यामुळे वन विभागाचे अधिकारी दुर्लक्ष करीत आहे हे म्हणणे योग्य नाही.

(३) पेंच व्याघ्र प्रकल्पातगतच्या शेतकऱ्यांना ग्राम परिसर विकास समितीचे गठण करुन व्यक्तीश लाभार्थीला ७५% अनुदान व २५% स्वगुंतवणुकच्या धरतीवर सौर उर्जेचे कुंपण देण्याची योजना EDC मार्फत गावागावात राबविण्यात येत आहे. आजपावेतो १४० लाभार्थींना सौर उर्जा कुंपण देण्यात आलेले असून रु. १९,८०,४०८/- निधी खर्च करण्यात आला आहे.

(४) शेतपिकांची नुकसानी भरपाई संबंधित ३८३६ प्रकरणांपैकी ३०५२ प्रकरणे निकाली काढण्यांत आली असून रु. २९५.५६ लाख इतकी नुकसान भरपाई बाधीत शेतकऱ्यांना आदा करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### गडचिरोली जिल्हातील मामा तलाव अतिक्रमणामुळे नामशेष होत असल्याबाबत

**(४५) ७९८४५ (१७-०४-२०१७). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील चामोर्शी तालुक्यातील ६४, कुरखेडा तालुक्यातील ८६, कोरची तालुक्यातील २१, मुलचेरा तालुक्यातील १४, देसाईगंज तालुक्यातील १४, आरमोरी तालुक्यातील १३, अहेरी तालुक्यातील ५, गडचिरोली तालुक्यातील ५ व इतर तालुक्यातील असे एकंदर २२७ मामा तलावांमध्ये अतिक्रमण असल्याचे भूमीअभिलेख कार्यालय, गडचिरोली यांचे सर्व्हेक्षणात निदर्शनास आल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ या कालावधीत निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी १३ तलाव अतिक्रमणामुळे नामशेष झाल्याचे सदर सर्व्हेक्षणात आढळुन आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तलावांमधील अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, नामशेष झालेल्या तलाव व अतिक्रमण काढण्यास दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२८-०६-२०१७) :** (१) होय

(२) हे खरे नाही.

१३ तलावामध्ये अतिक्रमण झालेले आहे. परंतु नामशेष झालेले नाहीत.

(३) २२७ मा.मा. तलावातील अतिक्रमण काढण्याकरीता तलावाच्या क्षेत्राची मोजणी करणे आवश्यक आहे. भूमिअभिलेख, गडचिरोली यांनी सादर तलावांची मोजणी करण्याकरिता रुपये २९,६३,३००/- मोजणी फी आकारणी केली आहे. सदर रक्कम जिल्हा परिषदने उपलब्ध करुन देण्याबाबत मागणी केली होती. जिल्हा निधीमधून निधी उपलब्ध करता येणे शक्य नाही असे कळविण्यात आले आहे. सर्व्हेक्षणासाठी निधी व लेखाशिर्ष उपलब्ध नसल्याने व प्राप्त निधी विकास कामा करीता असल्याने सर्व्हेक्षणावर व मोजणी करीता निधी खर्च करता येत नाही.

सन २०१६-१७ ते २०१८-१९ पर्यंत मा.मा. तलावांचे दुरुस्ती व बळकटीकरण योजनेत ३५५ तलाव घेण्यात आलेली आहेत. सदर योजनेमधून १५८ तलावांची मोजणी शुल्क भरण्यात आलेली आहे. व अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही सुरु आहे. जसजसे मोजणी शुल्कासाठी निधी उपलब्ध होईल त्याप्रमाणे तलावाच्या क्षेत्राची मोजणी करुन अतिक्रमण काढण्याचे जिल्हा परिषद, गडचिरोली यांचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) तलावाच्या क्षेत्राकरीता मोजणी शुल्क पुरेसा उपलब्ध होत नसल्यामुळे तलावातील अतिक्रमण काढण्यास विलंब होत आहे.

---

## चोरगांव (जि. चंद्रपूर) लघुसिंचन विभागाद्वारे बांधण्यात आलेल्या कोल्हापूरी बंधा-यातून पाण्याची गळती झाल्याबाबत

**(४६) ८००२३ (१८-०४-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोरगांव (जि. चंद्रपूर) येथे ३५ लाख रुपये खर्च करुन लघुसिंचन विभागाद्वारे बांधण्यात आलेल्या कोल्हापूरी बंधाऱ्यातून पाण्याची गळती झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२७-०६-२०१७) :** (१) अंशतः खरे आहे.

(२) व (३) सदर काम प्रगतीपथावर आहे. मौजा चोरगाव (जि. चंद्रपूर) येथील कोल्हापूरी पध्दतीचे बंधाऱ्याचे व्दार बसविण्याचे काम सुरु आहे. सदर बंधाऱ्याचे व्दार बसविताना व्यवस्थित न बसल्यामुळे काही प्रमाणात व्दाराच्या तळातून गळती सुरु होती. अशातच बंधाऱ्या लगतचे शेतकऱ्यांना सिंचनाकरीता पाण्याची अत्यावश्यकता भासल्यामुळे सदर व्दाराचे काम थांबविले होते. सद्यस्थितीत व्दार बसविण्याचे काम सुरु असून व्दारातून गळती पुर्णपणे बंद करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संजय गांधी राष्ट्रीय उद्यान,बोरिवली- पूर्व, मुंबई वन विभागांतर्गत वन जमिन क्षेत्र कमी करुन सदर जमिन नागरी विकासासाठी वापरण्याबाबत**

**(४७) ८१०६६ (१५-०४-२०१७). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली- पूर्व, मुंबई वन विभागांतर्गत वन जमिन क्षेत्र कमी करुन सदर जमिन नागरी विकासासाठी वापरण्याचा निर्णय मंत्रीमंडळाने माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई उपनगरातील पवई, आरे कॉलनी, फिल्म सिटी-गोरेगांव, आप्पापाडा-मालाड, दामूनगर, भिमनगर, जानूपाडा, धारखाडी, केतकीपाडा-दहिसर-पूर्व, त्रिमूर्ती, कुलूपवाडी-बोरिवली-पूर्व येथील वन जमिन नागरी विकासासाठी खुली करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या जमिनीवरील सन २००० पूर्वीच्या चाळ-वस्त्या, झोपडपट्टी, नियमित करुन त्यांचा पुनर्विकास केला जाणार आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०६-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) मा.उच्च न्यायालयाने संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वनजमिनीवरील अतिक्रमकांच्या पात्रतेबाबतची Cut off date ०१.०१.१९९५ ही अंतिम धरल्याने संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वनजमिनीवरील दिनांक ०१.०१.२००० पूर्वीच्या चाळ-वस्त्या, झोपडपट्टी नियमित करुन त्यांचा पुनर्विकास करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई उपनगरातील मागाठाणे येथे वन विभागात असणाऱ्या घरांना तात्पुरते स्थलांतरीत करण्याबाबत**

**(४८) ८११११९ (१८-०४-२०१७). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील मागाठाणे येथील केतकीपाडा, शंकर मंदिर टेकडी, सावित्रीबाई फुले नगर, समता नगर डोंगरी व रामनगर डोंगरी येथे वन विभागात असणाऱ्या घरांना धोका असल्याकारणाने त्याच ठिकाणी तात्पुरते स्थलांतर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मुख्य वन संरक्षक व संचालक, संजय गांधी उद्यान, बोरिवली-पूर्व यांच्याकडे लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने या घरांच्या तात्पुरत्या स्थलांतराबाबत कोणता निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०६-२०१७) :** (१) होय हे खरे आहे.

(२) रिट याचिका क्रमांक ३०५/९५ मध्ये मा. उच्च न्यायालयाने पारित केलेलया आदेशानुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वनजमिनीवरील सर्व प्रकारची अतिक्रमणे निष्कासीत करावयाची आहेत. सदर याचिकेतील आदेशानुसार दिनांक ०१.०१.१९९५ किंवा तत्पुर्वीच्या अतिक्रमकांची पात्रता निश्चित करुन पुनर्वसन करणे अपेक्षित आहे. सदर पुनर्वसनाकरीता झोपडपट्टी पूनर्वसन प्राधिकरणाकडून सदनिका उपलब्ध करुन घेणे आवश्यक असल्याने उपलब्ध झालेल्या सदनिकांमध्ये ११३८० अतिक्रमकांचे पुनर्वसन करण्यात आले आहे.

उर्वरित पात्र अतिक्रमांचे पूनर्वसन सदनिका उपलब्धतेनुसार, पूर्ण करुन वनजमिन अतिक्रमणरहित करावयाची कार्यवाही सुरु आहे.

वनजमिनीवरील अपात्र अतिक्रमकांचे तात्पुरते स्थलांतरणाचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळंब, बाभुळगाव, राळेगाव तालुक्यातील मेंढपाळांना वनविभागाचे राखीव क्षेत्र सोडुन चराईक्षेत्र पास मिळत नसल्याबाबत**

**(४९)** *८३३०८* **(१५-०४-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील कळंब, बाभुळगाव, राळेगाव तालुक्यामध्ये, मडकोना, मेंढला,घोटी, नरसापूर, सराटी, सावरखेडा, वरध हा भाग जंगलव्याप्त असून या भागामध्ये मेंढपाळ (धनगर)ची संख्या जास्त आहे त्यांच्याकडे जवळपास पंधरा हजार ते वीस हजार मेंढया आहेत.चराईक्षेत्र पास उपलब्ध नसल्याने मेंढया चराईस अडचण होत असल्याचे दिनांक १२ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनविभागाचे राखिवक्षेत्र सोडुन मेंढया चराईक्षेत्र उपलब्ध व्हावे करिता त्यांनी सबंधीत विभागाच्या अधिकाऱ्याकडे निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मेंढपाळानां राखिवक्षेत्र सोडुन चराईक्षेत्र पास उपलब्ध करुन देण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) मा.मंत्री उर्जा व पर्यावरण तथा पालकमंत्री यवतमाळ जिल्हा यांना यवतमाळ जिल्हयातील धानगर बांधवांनी उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने दिनांक ०८.०१.२०१७ रोजी निवेदन दिले आहे हे खरे आहे.

(३) यवतमाळ वनवृत्तातील वनविभाग निहाय मेंढी चराई संबंधी जमाबंदी अहवालास मान्यता देण्यात आली आहे. अकोला व पूसद विभागात मेंढी चराई क्षेत्र उपलब्ध करुन देण्यत आले आहे. तथापी यवतमाळ व पांढरकवडा वनविभागात मेंढीचराईकरीता क्षेत्र उपलब्ध नसल्याने मेंढी चराईचे पासेस देण्यात आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भूम (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील वालवड आंबेहोळ नदीवरील बंधारा फुटल्याबाबत**

**(५०) ८३४५४ (१८-०४-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूम (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील वालवड आंबेहोळ नदीवरील बंधारा माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमध्ये फुटल्यामुळे लोकप्रतिनिधींनी दिनांक ३१ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास बंधारा दुरुस्त करण्याबाबत मा.मुख्यमंत्री व मा.जलसंधारण मंत्री यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंधाऱ्याचे पिचींग व भराव फुटल्यामुळे पावसाळ्यात यातून लाखो लिटर पाणी वाया जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बंधारा फुटल्यामुळे नदीकाठच्या शेतीचेसुध्दा प्रचंड प्रमाणावर नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची चौकशी करुन शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१९-०६-२०१७) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) भूम तालुक्यात दिनांक १५/०९/२०१६ रोजी वालवड सिमेंट बंधारा क्र.२ च्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या अतिवृष्टिमुळे तसेच सदरील बंधा-याच्या अबटमंटच्या ५४७.६० मी पातळीवरून १.०० मीटर उंचीने पाणी वाहिल्यामुळे डाव्या बाजूचा भराव - पिचिंग वाहून गेले आहे. यामुळे सदर बंधाऱ्याच्या साठवण क्षमतेच्या ५०% पाणी वाहुन गेले आहे. अतिवृष्टीत बंधाऱ्याचे पार्श्ववहन झाल्यामुळे ०.२४ हे. जमीन खरडून गेली आहे. परंतु सदरील बंधाऱ्याच्या मुख्य बांधकामास कसलेही नुकसान झालेले नाही. बंधा-याच्या झालेल्या नुकसानाच्या अनुषंगाने बंधारा दुरूस्तीचे अंदाजपत्रक तयार करणेचे काम संबंधित कार्यकारी अभियंता स्तरावर प्रगतीत आहे. दुरूस्ती प्रस्तावास सक्षम अधिकाऱ्याकडून प्रशासकिय मान्यता घेवून निधी उपलब्धतेनुसार दुरूस्ती काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.